St. Mary's हॉस्पिटलच्या आतल्या त्या चॅपलमधे एरिकाने पाऊल ठेवले तेव्हा संध्याकाळ लोटून अंधार दाटून आला होता. Fall सुरु झाला होता, त्यामुळे हवेत गारवा होता. तिने मेणबत्ती पेटवली आणि मदर मेरी समोर जाऊन उभी राहिली. डोळे मिटून प्रार्थना सुरू करणार इतक्यात तिला तिच्या पर्समधल्या फोनची व्हायब्रेशन्स जाणवली. नंबर हॉस्पिटलचाच होता. तिने फोन उचलला आणि हॅलो म्हणायच्या आधीच पलिकडून आईंचा तो नेहमीचा आश्वासक आवाज आला, "बेटा एरिका, येशील का आपल्या रुमवर..?"

चार महिन्यांपूर्वी फोनवर आईंनी तिला अशाच आवाजात विचारले होते "बेटा एरिका, मी आले तर चालेल ना? प्रशांत insist करतोय पण मला तुला विचारायचे होते. माझा inconvinience तर होणार नाही ना?" तेव्हा बऱ्याचशा नाईलाजाने आणि थोड्याशा मनाच्या मोठेपणाने ती हो तर म्हणाली, पण जसजसा आईंचा अमेरिकेला यायचा दिवस जवळ येत चालला तसतशी तिची मनातली धाकधूक वाढायला लागली. फावल्या वेळात ती मराठी भाषा, मराठी पद्धती शिकायचा प्रयत्न करत होती पण खरंतर काय बोलणार होती ती त्यांच्याशी प्रशांतचा विषय सोडून? दोघींमध्ये काही common topics तरी असणार होते का? एरिकाने आतापर्यंत आईंशी फोनवरून थोडाफार जो संवाद साधला होता त्यावरून त्यांच्या खाण्या-पिण्याच्या सवयी, छंद आणि एकूणच दिनक्रमाचा तिला अंदाज आला होता पण ते सगळंच इतकं परकं आणि वेगळं होतं की त्यातलं काहीही तिला अमेरिकेत त्यांच्या घरी उभं करणं कसं जमणार होतं? मुख्य म्हणजे ज्या आईने आपल्या मुलाला संपूर्ण मराठी वातावरणात एकहाती वाढवलं, मोठं केलं, त्या मुलाचा अमेरिकन बाई बरोबरचा संसार बघून त्यांना खरच आवडणार होतं की त्यांच्या मनात अढी असणार होती?

प्रशांतला एरिकावरचा तणाव दिसत होता आणि तिची चाललेली धडपडही. तो तिला त्याच्या लहानपणाच्या गमतीजमती सांगून तिचा मूड हलका करायचा. ती जशी होती तशीच त्याला आवडली होती आणि त्याला खात्री होती किती ती त्याच्या आईच्याही पसंतीला उतरणार होती.

पेन्सिलवेनियात जन्मलेल्या नि कर्मठ ख्रिश्चन वातावरणात वाढलेल्या एरिकाने तिचे उच्च शिक्षण स्वबळावर पूर्ण केले होते. त्या दोघांची पहिली भेट कॉलेजमधलीच. त्यानंतर एका लॉ कंपनीत तिने summer associate पासून सुरुवात करत senior attorney पदापर्यंत मजल मारली होती. तिने एखादी गोष्ट करायची ठरवली की ती पूर्ण झोकून देऊन काम करत असे. प्रशांतच्या एका मित्राला त्याच्या कंपनीने जेव्हा insider tradingच्या खोट्या आरोपाखाली नोकरीवरून काढून टाकले तेव्हा तिने त्याच्या केसवर रात्रंदिवस मेहनत घेतली आणि अखेर त्या बलाढ्य कंपनीविरुद्ध जिंकून त्याला त्यांच्याकडून योग्य ती नुकसान भरपाई मिळवून दिली.

एरिका स्वाभिमानी होती, पण स्वार्थी नव्हती. तिला नात्यांचीही किंमत होती. प्रशांतशी डेट करत असताना जेव्हा तिच्या cousinने त्याच्या indian असण्यावरून "तुझ्या मुलांची नावे तू रेड पोटॅटो ठेवणार की रेड चेरी" असा कुजका प्रश्न तिच्या सगळ्या मित्रमंडळींच्यासमोर विचारला तेव्हा तिने शांत डोक्याने "सीझनप्रमाणे" असे मिश्किल उत्तर देऊन तिला त्या वेळेपुरते गप्प केले पण नंतर तिच्याशी एकांतात बोलून असले racist टोमणे खपवून घेतले जाणार नाहीत अशी ताकीदही दिली होती. त्यानंतर त्या cousinला तिची चूक उमगली आणि पुढे तिची प्रशांतशीही चांगली मैत्री झाली.

प्रशांतला जशी एरिकाच्या people मॅनेजमेंट स्किल्सबद्दल शंका नव्हती तशीच त्याच्या आईच्या समजूतदार स्वभावाबद्दल. त्यामुळे तो तसा निश्चिंत होता. अमेरिकन मुलीशी लग्न करताना परवानगी नव्हे तर थेट आशीर्वाद त्याने आईकडे मागितला होता, आणि आईने तो हसत हसत दिला सुद्धा होता.

हा हा म्हणता आईंचा अमेरिकेला यायचा दिवस उजाडला. दोघानी घरात स्वागताची अगोदरच तयारी केली होती. तळमजल्यावरील स्टडीरूमला folding door लावून त्याची तात्पुरती बेडरूम तयार केली होती. अमेरिकेत summer सुरु झाला होता त्यामुळे हवा आल्हादायक होती. एरिकाने indian dress म्हणून फिकट गुलाबी रंगाचा

चुडीदार घातला, छोटेसे मंगळसूत्र घातले, टिकली लावली आणि दोघे एअरपोर्टला पोचले. पहिल्यांदा फुलांचा बुके हातात द्यावा की वाकून नमस्कार करावा असा विचार करत असतानाच त्या दोघांची आईबरोबर नजरानजर झाली. बघतात तर काय, आई top नि jeans मधे! खांद्यावर पर्स आणि गॉगल डोक्यावर चढवलेला आणि हातात starbucks कॉफीचा कप! एरिकाला लहान मुलीसारखं हसूच फुटलं आणि सारे सासु-सुनेचे शिष्टाचार सोडून तिने पुढे जाऊन आईंना एखाद्या मैत्रिणीला मारावी तशी मिठी मारली.

साऱ्या आठवणी एरिकाच्या डोळ्यासमोरून झरकन निघून गेल्या. ती चॅपलमधून चालत हॉस्पिटलच्या लिफ्टसमोर आली. आत शिरल्यावर सराईतपणे तिने चौथ्या मजल्याचे बटण दाबले. गेले सहा सात दिवस हे हॉस्पिटल म्हणजे तिचे नि आईंचे दुसरे घरच झाले होते. खरं तर हॉस्पिटलमध्ये admit व्हायचं कारण तिच्याकडे होतं, तेही दोनएक महिन्यांत. तयारी सुद्धा बरीचशी झाली होती, infant कारसिट, stroller, अगदी डिलिव्हरीसाठीची हॉस्पिटल बॅग सुद्धा तयार होती. पण प्रशांतच्या या accident ने तिचं सगळं आयुष्यच विस्कळीत, नव्हे पूर्णपणे कोलमडून गेलं होतं.

अमेरिकेत पोचल्यावर एक दोन दिवसांतच अनेक गोष्टी आईंच्या अनुभवी नजरेनं टिपल्या होत्या. एरिका आणि प्रशांतच्या संसारात नीटनेटकेपणा हा प्रशांतमुळे होता. साफसफाई, आवरावर हे त्याचे आधीपासूनचे गुण. घरची बेताची परिस्थिती, आणि मुख्य म्हणजे लहानपणीच वडिलांचे हरपलेले छत्र, यामुळे तो पहिल्यापासून वयापेक्षा जास्त matured वागायचा. आता तर तो घरातल्या नि घराच्या बाहेरच्या, सगळ्याच गोष्टींची काळजी घेत होता. एरिकाला चौथ्या महिन्यापासून थकवा जाणवू लागला होता, शिवाय drivingचा stress सुद्धा तिला नको व्हायचा म्हणून ती बहुतेक वेळा घरातूनच काम करत असे. तिला तिची तब्येत आणि तिचं काम यापलीकडे खरं तर फुरसतच नव्हती पण तरी घराच्या interior डेकोरेशन मधे तिला बराच इंटरेस्ट होता. जेवणात वेगवेगळी salads नि ओवनमधे baked पदार्थ बनवण्याकडे तिचा कल होता. तसे दोघेही एकमेकांबरोबर आनंदी होते आणि आईंना त्यांच्या संसारात उगाच नाक खुपसायची इच्छा नव्हतीच, त्यामुळे त्यांनी आठवड्याभरातच सगळ्या गोष्टींचा अंदाज घेत त्यांचा स्वतःचा दिनक्रम set केला.

खरंतर प्रशांत आणि एरिकाबरोबर गप्पागोष्टी करत, पत्ते नि बैठे खेळ खेळत, स्वयंपाक करत किंवा देशोदेशीचे पदार्थ शिकत आईंचा वेळ भराभर उडून जायचा पण त्यांची सगळ्यात आवडणारी वेळ होती सकाळची. मॉर्निंग वॉकला जायची आईंना सवय होतीच. त्या इथेही अमेरिकेत दिवस असाच सुरु करत. टुमदार घरांच्या कॉलनीमधून hi-hello करत फेरफटका मारताना, हरेक घरासमोरची मखमली लॉन, मोहक फुलझाडं आणि हिरवेगर्द वृक्ष बघून त्यांचं मन प्रसन्न होऊन जायचं.

आईंच्या या झाडा-पानाच्या छंदाबद्दल प्रशांतने सांगितले होते, परंतु त्यांना झाडांची, फुलांची इतकी आवड असेल असे एरिकाला वाटले नव्हते. तिच्याकडून पटापट माहिती करून घेत त्यांनी त्यांच्या backyardच्या छोट्याशा बगीच्याचा ४-५ दिवसातच पूर्ण ताबा घेतला. मग एरिकाने त्यांना लायब्ररीमधून american plants आणि flowers बद्दलची पुस्तकं आणून दिली. त्यांच्याबरोबर नर्सरीमध्ये जाऊन वेगवेगळ्या फुलझाडांची रोपं आणि garden soil आणली. आणि म्हणता म्हणता दोघींनी त्यांच्या त्या छोट्याशा बगिचाचे एका सुंदर फुलांच्या गार्डनमध्ये रूपांतर केले. मग एरिका कुठे ऑर्किड, कुठे रोझेस अशी रोज वेगवेगळ्या फुलांची सजावट घरात करुन स्वतःची डेकोरेशनची हौस भागवायला लागली. अहाहा, कुठे ते मनमोहक रंग आणि कसलं हे मळखाऊ राखाडी रंगाचं दार! विचारांच्या तंद्रीत ती हॉस्पिटलच्या रूमच्या दरवाजाजवळ पोचली होती.

दरवाजा उघडून आत गेल्यावर खुर्चीवर बसलेल्या आईंची आणि तिची नजरानजर झाली आणि आईंनी त्यांचं वाचन थांबवलं. त्या कुणा बाबा-बुवांच्या भक्त नव्हत्या पण गीता आणि वेद यांचं त्या नियमित वाचन करायच्या.

"ये बेटा!" बेडकडे इशारा करत त्या म्हणाल्या, "अगं, त्याने त्याचं बोट दोनदा हलवलं. He moved his finger 2 times, in a minute! "

एरिका कसनुसं हसली. प्रशांतच्या या development बद्दल आनंद मानावा का? की हे फक्त रिफ्लेक्सेस होते डॉक्टर म्हणाले होते तसे? जाऊ दे, उगाच मनाला खोटी अशा लावू नये असा तिने विचार केला पण आईंना चांगलं वाटावं म्हणून ती म्हणाली "Oh wow, that's a great progress!"

"हो ना! त्याला मी पहिल्या दिवसापासून सांगते आहे त्याची जागा या बेडवर नाही तर आपल्या घरात आहे. घरात आणि ऑफिसात त्याची कामं त्याची वाट पाहताहेत. He cant afford to just sleep here! त्याला लवकरात लवकर उठलं पाहिजे नाही का?"

एरिकाने होकारार्थी मान हलवली. तिला आईंचे हे रूप नवीन होते. तिच्या दृष्टीने आईंना accidentचा धक्का बसला होता आणि त्या धक्क्यातून सावरण्यासाठी त्या त्यांच्या मुलाशी बोलत बसायच्या. Probably it was her way of dealing with the grief. पण तिने त्यांना रडताना पाहिले नव्हते, उलट स्पष्ट आवाजात प्रशांतशी हुज्जत घातल्यासारखं बोलताना ऐकले होते. त्या प्रशांतला त्याच्या लहानपणीच्या गोष्टी आठवून द्यायच्या, किंवा प्रश्न विचारायच्या आणि तो बोलत नाही म्हटल्यावर त्याच्यावर खोट्याखोट्या रुसायच्यादेखिल. पण आज त्यांचा आवाज जास्तच टोकदार झाला होता.

"प्रशांत तुला आठवतं, दर बुधवारी तू क्लासमधून सायकलवरून येताना पिठाच्या गिरणीतून न चुकता पीठ आणायचास. विसरलास का कधी? की कधी तक्रार केलीस? नाही ना, अरे मग आता घरातलं पीठ संपलय आणि तू इथे झोपून राहिलास, तर इंडियन स्टोअरला जायला गाडी कोण चालवणार आणि त्या indian atta ची जड bag कोण उचलणार?"

प्रशांतला असं सुनावण्यापेक्षा आधी सांगितले असते तर ती जाऊन इंडियन स्टोअरमधून पीठाची छोटी bag आणि इतर सामान घेऊन येऊ शकली नसती नाही का? येता येता त्याला आवडणारी ती केवड्याची सुवासिक मेणबत्ती, sorry अगरबत्ती सुद्धा. तिला आईंचा या क्षुल्लक कारणावरुन केलेला त्रागा कळत नव्हता.

प्रशांतला highwayवर कार अॅक्सिडेंटमध्ये डोक्याला जबर इजा झाली होती. चूक त्याची नव्हती पण शिक्षा मात्र त्याला भोगायला लागत होती. Internal bleeding मुळे तो कोमामध्ये होता. औषधोपचार सुरू होतेच. पण त्याला comfortable वाटावं म्हणून, घरातून दोघांचे फोटो, त्याची आवडती बुद्धाची मुर्ती आणि काही favorite पुस्तकं आणून एरिका त्या hospital room ला homelike बनवायचा प्रयत्न करत होती. डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे त्याच्याशी बोललेले त्याला कदाचित ऐकू सुद्धा येत होते. त्यामुळे ती एकांतात त्याच्याशी बोलून त्याला त्यांच्या प्रेमाच्या गोष्टी सांगायची आणि त्या आठवून कधीकधी स्वतःच रडायची.

तिने हळूच प्रशांतचा हात हातात घेतला आणि आईंकडे वळून म्हणाली "आई, you must be tired. मी तुम्हाला थोडा वेळ घरी सोडू का?"

"नाही गं! म्हणजे दमले आहे मी, पण कंटाळलेय जास्त इथल्या वातावरणाला. आणि हो, आज याला आपल्याला इथून न्यायचे आहे घरी. हॉस्पिटलच्या या उदास वातावरणात कुणाला रहावंसं वाटणार? प्रशांत, तयार आहेस ना?"

"आई, इट्स ओके! बरं आपण थोडंसं खाऊन घेऊ या का? You haven't had anything all day.."

"नाही गं, नको मला." आई उठून प्रशांतच्या बेडजवळ आल्या, "प्रशांत, तू लहानपणापासून जबाबदारीने वागत आला आहेस. यांच्या पश्चात घरातला तू पुरुष बनून सगळी जबाबदारी उचललीस. आज तुझ्यावर माझी आणि तुझ्या बायकोची जबाबदारी आहेच पण दोन महिन्यांत एका नवीन जीवाची सुद्धा मोठी जबाबदारी येणार आहे, नव्हे तुम्ही ती घेतलेलीच आहे. त्याच्यासाठी तरी तुला उठावेच लागेल. की तू जसा बिनवडिलांचा वाढलास तसं आम्ही दोघींनी तुझ्या बाळाला वाढवायचं? ते काही नाही, हे आता सगळं आम्हा दोघींवर सोडून तुला असं झोपून चालणार नाही. चल उठ!"

एरिकाला सारे शब्द कळत नव्हते पण भावना पोचत होत्या. प्रशांतची कंडिशन तिला अगोदरच बघवत नव्हती, वर आईंचे बोलणे त्याला किती जिव्हारी लागत असेल? तिचे डोळे अलगद पाणावले. आता आईंना सुद्धा सावरण्याची वेळ आली होती. ती वळणार एवढ्यात प्रशांतच्या पापण्यांची थरथर तिने टिपली. तिचा खरं तर विश्वासच बसेना. पण इथे आईंचा आवाज अजून ठाम होता आणि चेहरा कठोर. "आज संकष्टी आहे बेटा, आणि तुला माहितीये, तू उठून तुझ्याबरोबर आरती केल्याशिवाय मी माझा उपास सोडणार नाही. आता तू ठरव आईला किती वेळ उपाशी ठेवणार ते!"

प्रशांत पापण्यांची जलद उघडझाप करू लागला. त्याने आपल्या हाताने एरिकाचा हात दाबत हळूहळू डोळे उघडले. त्याला शुद्ध आली होती. इकडे आईंचा चेहरा सौम्य होत होता. त्यांनी डोळे भरुन पोराकडे पाहिले.

"बेटा एरिका" आईंचा तो नेहमीचा आश्वासक पण थोडासा मिश्कील आवाज आला. "तुला मी मातीचा लेप वापरुन गुलाबाच्या छाट्याचे कलम कसे करायचे ते दाखवले होते ना? या माझ्या पोराच्या आयुष्याची फांदी अशीच अमेरिकन मातीतल्या जीवनावर कलम झाली आहे अगं. मला खात्री आहे या फांदीला पुढे छानछान रंगाची फुले फुलतील, पण जर कधी या कलमाला रोग झाला किंवा कीड लागली तर हा असा त्या मूळ मराठी मातीचा लेप तिथे दाबून लावायचा, म्हणजे तो थेट आतवर घुसतो आणि सारी कीड काढून टाकतो, बरं का?"

एरीकाला कळायचे ते सारे कळले आणि तिच्या चेहऱ्यावर हसू उमटले. प्रशांत दोघींच्या समाधानी चेहऱ्याकडे आलटून पालटून पहात राहिला.

-- समाप्त